**MHAH180016192019**

**<u>नियमित दावा क्रमांक ६२९ सन २०१९ नि.क्र. ५ खालील आदेश</u>**
**(CNR NO.-MHAH180016192019)**

श्री. अरूण पुंजाहरी सांगळे व इतर २ ..वादी
**विरुध्द**
श्रीमती हिराबाई दिनकर पाळंदे व इतर ४ . .प्रतिवादी
....

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादींविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केलेला असुन रस्ता केस क्र.१६/२०१६ चे निकालाची अंमलबजावणी प्रतिवादींनी करून घेवू नये असा तुर्तातुर्त मनाईहुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**<u>वादींची थोडक्यात हकीकत अशी की,</u>**

**२.** प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. दावा कलम १ मधील मिळकत गट नं. ५२८ पैकी क्षेत्र २ हे. ६९ आर अधिक पोट खराबा १ हे. २१ आर. मौजे निंबेरे ता. राहुरी जि. अहमदनगर येथील रे.मु.नं. ९३७/२०१८ मधील वाटपाच्या हुकुमनाम्याने वादींना मालकी हक्काने मिळाली असुन दावा मिळकतीचे लगत पश्चिमेस प्रतिवादींची जमिन गट क्र. ५२९ आहे. मात्र दावा मिळकतीचे उत्तर बांधाने प्रतिवादींना त्यांच्या जमिनीत जाण्यासाठी कधीही रस्ता नव्हता व नाही. परंतु, प्रतिवादी हे नंगट व कायदयास न जुमानणारे असल्यामुळे त्यांनी न्यायालयात रे.मु.नं. १४७/२०१६ चा दावा निरंतर मनाई हुकुमासाठी दि. २०/०२/२०१६ रोजीच्या खोटया नाटया कारणास्तव दाखल केला असता न्यायालयाने अदयापही त्या दाव्यात मनाई हुकुम दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींनी या वादी व वादी कुटुंबातील इतरांविरूध्द तहसीलदार राहुरी यांच्या न्यायालयात रस्ता केस क्र. १६/२०१६, दि. २२/०५/२०१६ रोजी दाखल केला असून त्यांनी महसुल अधिका-यांना हाताशी धरून, खोटे-नाटे पंचनामे करून घेतले व

त्या आधारे तहसीलदार यांनी प्रतिवादींना त्यांची जमिन गट क्र. ५२९ मध्ये जाण्यासाठी दावा मिळकतीच्या उत्तर बांधाने रस्त्यास हरकत अडथळा निर्माण करू नये असा निकाल दि. १०/०८/२०१९ रोजी दिला. वास्तविक पाहता वादींची जमिन गट क्र. ५२८ मधून उत्तर बांधाने प्रतिवादींची जमिन गट क्र. ५२९ मध्ये जाणारा कोणताही रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता. मे. तहसिलदार यांनी वहीवाट हक्काबाबत कोणताही साक्षीपुरावा न घेताच, उभयतांचे जाब-जबाब न घेताच तसेच रस्त्याच्या वहीवाटीचा हक्क ठरविणेबाबत कोणताही पुरावा न घेता रस्त्यास हरकत-अडथळा निर्माण करू नये असा निकाल दि. १०/०८/२०१८ रोजी वादींविरूध्द दिलेला आहे. तो पुर्णत: बेकायदा व रद्दबातल आहे व त्याचे अंमलबजावणीसाठी मंडळ अधिकारी यांनी दि. १८/०७/२०१९ रोजी नोटीस बजावल्याने मे. तहसिलदार यांचा वर नमुद निर्णय रद्द होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी नि. क्र. २० अन्वये त्यांचे म्हणणे दाखल करून त्यात असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांची मालकीची मौजे निंभेरे ता. राहुरी जि. अहमदनगर येथे गट क्र. ५२९ ही शेत जमिन मिळकत आहे. सदरील मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची असून प्रतिवादी हे सालोसाल वहीवाट करून उत्पन्न घेत आहे. गट क्र. ५२८ च्या पुर्वेस जिल्हा परिषद राज रस्ता आहे. सदर राज रस्त्यावरून गट क्र. ५२८ चे उत्तरेकडे नाला बंडिंग बंधा-यावरून प्रतिवादी यांना त्यांचे मिळकतीमध्ये जाणे-येणेसाठी पुर्व-पश्चिम असा पुर्वापार जुना वहीवाटीचा रस्ता होता व आहे. त्याच रस्त्याने प्रतिवादी हे त्यांचे मिळकतीमध्ये ये-जा करीत आलेले आहेत. सदरील रस्त्याशिवाय या प्रतिवादी यांना त्यांचे मिळकतीत जाणे-येणे साठी दुसरा कोणताही पर्यायी रस्ता नव्हता व नाही. परंतु, प्रतिवादी यांच्या सदर रस्त्याच्या पुर्वापार वहीवाटीस वादी यांचे वडील पुंजाहरी बाबुराव सांगळे व इतर यांनी हरकती सुरु केल्या तसेच, पुर्वापर वहीवाटीचा रस्ता वापरास हरकत करून त्या रस्त्यावर अडथळे निर्माण केले. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादी यांचे वडील व इतर यांचे विरूध्द मे. तहसिलदार, राहुरी यांचे समोर ममलतदार कोर्ट ॲक्टचे कलम ५(२) प्रमाणे रस्ता केस क्र. ९६/२०१६ चा अर्ज दाखल केला. त्या अर्जाचे कामी तहसिलदार राहुरी यांनी गुण दोषावर चौकशी करून प्रतिवादी यांचा पुर्वापार वहीवाटीचे रस्त्याचे वापरास व उपभोगास हिल्ला हरकत करू नये असा वादींविरूध्द आदेश दि. १०/०८/२०१८ रोजी दिलेला आहे. त्यानंतर वादींनी सदरील आदेशावर नाराज होवून प्रतिवादी यांचे विरूध्द उप-विभागीय

अधिकारी श्रीरामपुर, भाग श्रीरामपुर यांचे समोर आर.टी.एस. अपिल नं. ११७/२०१७ चे दाखल केलेले होते. सदरचे अपिल देखील उप-विभागीय अधिकारी श्रीरामपुर, भाग श्रीरामपुर यांनी रद्द केलेले आहे. त्यानंतर वादी यांनी पुन्हा त्या निकालावर नाराज होवून उप-जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे समोर आर.टी.एस.रिव्हीजन क्र. २०/२०१८ चे दाखल केलेले होते. परंतु, सदरील रिव्हीजन अर्जाची देखील गुण दोषावर चौकशी होवून उप-जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी तो अर्ज रद्द केलेला आहे. सबब, वादी यांना सदरचा निकाल रद्द करून मागण्याचा अगर मनाई हुकुम मागण्याचा कायदयाने मुळीच अधिकार नाही. वादींच्या लाभात जर तुर्तातुर्त मनाई हुकुम दिला तर वादी हे प्रतिवादी यांना पुर्वापार रस्त्याचे वहीवाटीस अडथळे निर्माण करतील व प्रतिवादी यांचे कधीही व कशानेही भरून न येणारे असे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज रद्द करण्याची मागणी प्रतिवादी यांनी केली.

**४.** प्रस्तुत अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे यांचा विचार करता खालील मुद्दे माझे निष्कर्षास येतात, त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसहीत करीत आहे.-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी हे सिध्द करतो काय की, त्यांची प्रथमदर्शनी बाजु आहे? | नाही |
| २ | वादी हे सिध्द करतो काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे? | नाही |
| ३ | वादी हे सिध्द करतो काय की, सदरचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांना अपरिमित असे नुकसान सोसावे लागणार आहे ? | नाही |
| ४ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ बाबत -</u>**

**५.** मुद्दे क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संबंधित आहेत. त्यामुळे पुराव्यातील तीच ती चर्चा टाळण्याकरीता मी मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष एकत्रित नोंदवित आहे.

**६**. वादींचे असे कथन आहे की, दावा मिळकत गट क्र. ५२८ ही वाटपाच्या हुकुमनाम्याने त्यांना मालकी हक्काने मिळालेली आहे. वादींचे हे कथन शाबित करण्यासाठी त्यांनी रे.मु.नं. ९३७/२०१८ यातील सुलेनामा/तडजोड नाम्याची सत्यप्रत नि.क्र. ३/३ व ३/४ अन्वये दाखल केलेली आहे. त्यानुसार दावा मिळकत ही वादींच्या मालकीची असल्याचे स्पष्ट होते.

**७.** वादींचे पुढे असे कथन आहे की, तहसिलदार, राहुरी यांनी रस्ता केस क्र. १६/२०१६ मध्ये दिलेला न्यायनिर्णय हा कायदयास अनुसरून नाही. त्यामुळे सदरच्या निकालाची अंमलबजावणी होवू नये तसेच सदरचा निकाल रद्दबातल ठरवून मिळावा. निश्चितच जर तहसिलदार यांनी दिलेल्या निकालात जर काही दोष अथवा त्रुटी असतील तर त्यात दिवाणी न्यायालय हस्तक्षेप करू शकतात. परंतु, त्यांनी दिलेला निर्णय चुकीचा आहे अथवा बरोबर आहे ही संपुर्ण बाब दाव्याच्या चौकशी दरम्यानच संपुर्ण पुरावा लक्षात घेवून त्यानंतर गुण दोषावर निश्चित करता येते. प्रस्तुत निकालातील पंचनामा तसेच जे.सी.बी. चालक सारंगधर साबळे व साक्षीदार नामे दिनकर अंतु पाळंदे यांचा जबाब व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे स्पष्टपणे दिसून येते की, वादींनी प्रतिवादींचा रस्ता बंद केलेला आहे. वादींचा अर्ज व त्यावरील दाखल केलेले कागदपत्र यांचे अवलोकन केले असता असे स्पष्टपणे दिसून येते की, तहसिलदार राहुरी, उप-विभागीय अधिकारी श्रीरामपुर, भाग-श्रीरामपुर व उप-जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दिलेला निर्णय हा प्रथमदर्शनी चुकीचा दिसून येत नाही.

**८.** प्रस्तुत दाव्यात जर वादींना तुर्तातुर्त मनाई हुकुम दिला नाही तरी देखील त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, जर प्रतिवादींना तुर्तातुर्त मनाई हुकुम दिला नाही तर त्यांचे अतोनात असे कधीही न भरून निघणारे असे नुकसान होईल.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत-</u>**

**९.** तुर्तातुर्त मनाई हुकुम पारित करण्याकरीता आवश्यक असलेले वर नमुद मुळ घटक वादींनी शाबित केलेले नाही. त्यामुळे, वादींचा नि. क्र. ५ वरील अर्ज मंजुर करणे उचित होणार नाही. वर नमुद कारणास्तव मी मुद्दा क्र. ४ च्या अनुशंगाने खालील आदेश

पारित करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | वादींचा अर्ज (नि.क्र. ५) नामंजूर करण्यात येत आहे. |
| २ | प्रस्तुतचे अर्जाचा खर्च अंतिम न्यायनिर्णया सोबत राहील. |

MAYA POPATRAO MATHURE
Digitally signed by MAYA POPATRAO MATHURE
Date: 2021.11.29 13:40:32 +0530

दिनांक : २९.११.२०२१
राहुरी

(माया.पो.मथुरे)
२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर
राहुरी